| | |
|---|---|
| MHSN110001572026 | **निशाणी क्र. १ वरील आदेश**<br>**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १२/२०२६**<br>**जिजाबाई दत्तात्रय घोडके वि. महाराष्ट्र शासन** |

१. प्रस्तुतचे अर्जाद्वारे अर्जदार जिजाबाई दत्तात्रय घोडके यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ प्रमाणे दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे की, ते मौजे राजेवाडी, ता.आटपाडी, जि.सांगली येथील कायमचे रहिवाशी आहेत. त्या त्यांचे कुटूबांतील उपजिवीकेसाठी शेती व शेळीपालन व्यवसाय करतात. दिनांक ३१/१२/२०२५ रोजी अज्ञात चोरट्यांनी अर्जदार यांच्या मालकीचे १२,०००/– रुपये किमतीची तीन वर्षाची काळया रंगाची शेळी, तीन वर्षाची तांबडया रंगाची शेळी रक्कम रु.१२,०००/– किमतीची आणि २०००/– रुपये किमतीचे काळया रंगाचे करडू चोरुन नेले होते. त्याबाबतची फिर्याद आटपाडी पोलीस ठाण्यात गु.र.नं.२/२०२६ अन्वये नोंदविली आहे. अर्जदार यांनी पुढे असे कथन केले की, चोरट्याने अर्जदार यांचे मालकीचे वरील मुद्देमाल विकून मिळवलेली रक्कम रु.२६,०००/– पोलीस ठाण्यत जप्त करुन जमा करण्यात आली आहे. सदरचे जप्त केलेले पैसे हे अर्जदार यांचे दोन शेळी व एक करडू यांची विक्री करुन मिळणारी किंमत ताब्यात मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदरचा मुद्देमाल अर्जदार यांचे ताब्यात दिल्यास अर्जदार हे न्यायालय नेमतील त्या तारखेला अथवा पोलीस ठाण्यात तपासकामी हजर करतील. तसेच सदर मुद्देमालामध्ये कोणताही बदल करणार नाही. त्यामुळे सदरचा मुद्देमाल हा योग्य त्या शर्ती व अटीवर अर्जदाराचे ताब्यात परत मिळावा म्हणुन सदरचा अर्ज अर्जदार यांनी दाखल

केला आहे. तसेच बंधपत्र देखील अर्जदार देणेस तयार आहेत. तरी आटपाडी पोलीस स्टेशन गु.र.नं. २/२०२६ मधील वर नमुद जप्त मुद्देमाल म्हणजेच शेळया व करडू विक्री करुन मिळालेली रक्कम रु.२६,०००/– अर्जदार यांना योग्य त्या शर्ती, अटी व बॉण्डवर परत मिळावेत अशी विनंती केली आहे.

४. प्रस्तुत अर्जास अन्वेषण अधिकारी नि. ०५ प्रमाणे यांनी तसेच सहा. सरकारी अभियोक्ता यांनी आपले म्हणणे नि. ०६ वर दिले आहे. अन्वेषण अधिकारी यांनी वर नमुद गुन्ह्यातील मुद्देमाल / रक्कम अर्जदार यांनी मागणी केलेप्रमाणे योग्य त्या अटी शर्तीसह अर्जदार यांना परत करण्यास काहीएक हरकत नाही असे आपले म्हणणे दाखल केले.

५. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी नि.०६ नुसार सदर अर्जास हरकत घेतली. त्यांचे म्हणणेनुसार त्यांना अर्जदार यांचा अर्ज मान्य नाही कबुल नाही. अर्जदार कथन करतो त्याप्रमाणे मुद्देमाल हा आ.गु.र.नं. २/२०२६ बी.एन.एस. कलम ३०३(२) प्रमाणे जप्त करण्यात आलेला आहे. सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा व अजामीनपात्र आहे. एफ.आय.आर. पाहता अर्जदार हा आरोपी नसल्याचे दिसुन येते. तसेच मुळ फिर्यादी असल्याचे दिसून येते. सदरचा मुद्देमाल हा चोरटयाने २ शेळया व १ करडू विकुन मिळवलेली रक्कम अशा स्वरुपाचा आहे. अर्जदाराच्या मागणीनुसार मुद्देमाल परत दिल्यास त्याची व्यवहारात वापर होण्याची शक्यता आहे. सबब वरील सर्व कारणांचा विचार होऊन व अर्जाच्या अंतिम युक्तीवादावेळी सांगितल्या जाणा–या मुद्यांचा विचार होऊन अर्जदार यांचा अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली.

६. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार याने त्याचे अर्जाचे पृष्ठ्यर्थ आटपाडी पोलीस ठाणे गु.र.नं. २/२०२६ ची एफ.आय.आर. प्रत, अर्जदाराचे आधारकार्डची प्रत ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सदर कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कोणतेही कागदपत्रे अर्जदार यांनी दाखल केलेले नाहीत. तपासिक अन्वेषण अधिकारी यांचे म्हणणे वाचले असता असे दिसून येते की, गु.र.क्र.२/२०२६ हा अज्ञात इसमा विरुध्द अर्जदार यांनी दिनांक ०१/०१/२०२६ रोजी गुन्हा दाखल केलेला होता. सदर गुन्ह्यामध्ये तपासी अंमलदार यांनी आरोपी यांचा शोध घेवून आरोपी जिवन राजाराम साठे, वय २६ वर्षे, रा. शेगाव, ता.जत, जि.सांगली व त्याचा साथीदार राजकुमार उत्तम बुचडे, वय–२७ वर्षे, रा. वाकी शिवणी, ता.सांगोला, जि.सोलापूर यांनी गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या २ शेळया व १ करडु यांचे मिळून येणारी रक्कम रु.२६,०००/– दि.०३/०२/२०२६ रोजी दोन पंचासमक्ष हजर केल्याने तपासी अंमलदार यांनी ती जप्त केली आहे. सदर जप्त रक्कमेची मागणी इतर कोणीही केलेली दिसून येत नाही. प्रस्तुत अर्जदार यांनी सदर बाब शपथेवर कथन केल्याचे दिसून येते. सबब अर्जदार हे जप्त मुद्देमालाचे मालक आहेत. ***मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सुंदराबाई देसाई वि. गुजरात सरकार*** या न्यायनिर्णयामध्ये दिलेले निर्देशानुसार सदरचे मुद्देमाल पोलिस स्टेशनच्या परिसरात पडून राहिल्यास त्याचे मुल्य नक्कीच कमी होईल. त्यामुळे बी.एन.एस.एस. चे कलम ५०३ अन्वये त्या मुद्देमालाचा अंतरिम ताबा अर्जदारास दिला जावू शकतो. त्यावेळेस योग्य त्या अटी व शर्ती अर्जदार याचेवर लादून तसा ताबा देता येतो. वरीलप्रमाणे चौकशी केली असता माझे समाधान झाले आहे की, अर्जदार हा जप्त मुद्देमाल ताबेमध्ये देण्यास योग्य व्यक्ती आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. अर्जदार यास असे निर्देशित करणेत येते की, त्याने रक्कम रुपये ३०,०००/– (रुपये तीस हजार मात्र) चे बंधपत्र खालील अटीशर्तींस आधीन राहून करुन घ्यायचे आहे.

**अ.** अर्जदार याने न्यायालय जेव्हा निर्देशित करील तेव्हा जप्त मुद्देमालाची रक्कम रु.२६,०००/–न्यायालयात हजर करावयाचे आहे.

**ब.** यात कसूर केल्यास सदरचे बंधपत्राची रक्कम वसुल करण्यात येईल.

३. तपास अधिकारी यांनी आरोपीकडुन इंडेम्निटी बॉण्ड घ्यावे. तसेच संबंधीत मुद्देमाल अर्जदार यांचे ताब्यात देताना त्यांचे रंगीत छायाचित्रे काढून, त्यावर अर्जदाराच्या सह्या घेऊन तसा पंचनामा करुन तो पंचनामा आणि इंडेम्निटी बॉण्ड गुन्ह्याचे कामी अंतिम अहवालासोबत दाखल करावयाचा आहे.

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2026.04.02 17:58:32 +0530

आटपाडी. **(आर. बी. कुलकर्णी)**

दिनांक २७/०३/२०२६ सह. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आटपाडी

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | - A.S. Yadav |
| Court | - Jt. CJJD and JMFC, Atpadi. |
| Date | - 27/03/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | - 27/03/2026 |
| Order uploaded on | - 02/04/2026 |